# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

**जाहिरात क्र. 94/ज.स./2021** **दि. 09/07/2021**

## थेट मुलाखत

नागपूर महानगरपालिकेतील विविध कामाची माहिती तथा प्रसिध्दी नागरीकांपर्यन्त पोहचविण्याच्या उद्देशाने ''मिडीया समन्वयक'' हे पद निव्वळ कंत्राटी तत्वावर प्रथमतः 6 महिन्याचे कालावधी करिता, एकमुस्त मानधन रू. 25,000/– वर भरावयाचे आहे. इच्छुक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरिता आवश्यक कागदपत्रांसह दि. 22/07/2021 रोजी सकाळी 10 : 30 वाजता, अति. आयुक्त (शहर), नवीन प्रशासकीय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर यांचे कार्यालय येथे उपस्थित राहावे.

| अ. क्र. | पदाचे नांव | एकुण पदे | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता व अनुभव. |
|---|---|---|---|---|
| 1 | मिडीया समन्वयक | 01 | 50 वर्षे पेक्षा जास्त नसावी | 1) मान्यताप्राप्त विद्यापीठाची जनसंवाद विद्याविभागातील पदव्युत्तर (Post-Graduate) परीक्षा उत्तीर्ण असावा,<br>2) पत्रकारितेच्या क्षेत्रातील बातमीदारीचा वृत्तपत्रातील 10 वर्षापेक्षा अधिक अनुभव आवश्यक (ग्रेड 1 वृत्तपत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य)<br>3) वृत्त लिखाण, वृत्त संपादनात कौशल्य व अनुभव प्राप्त असावे,<br>4) मनपाच्या विविध विभागाच्या योजना, माहिती यावर लिखाणाचे कौशल्य असावे,<br>5) विविध विषयाचे आकलन व ज्ञान असावे,<br>6) नेतृत्वक्षमता आणि उत्कृष्ट जनसंपर्क, व्यवस्थापन आणि प्रशासन कौशल्य क्षेत्रातला अनुभव आवश्यक,<br>7) आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे कौशल्य असावे, समाजमाध्यमांची जाण असावी आणि समाजमाध्यमांवर सक्रीय असावा.<br>8) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांवर प्रभुत्व असावे,<br>9) वयोमर्यादा कमाल 50 वर्षे असावी.<br>10) मनपाच्या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

वरील उमेदवारांनी दि. 22/07/2021 रोजी सकाळी 10:30 ते 12.00 पर्यंतच्या दरम्यान आपले नाव नोंद करावे. विहीत वेळेनंतर येणा—या उमेदवारांच्या नावाची नोंद करण्यांत येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. पात्र अर्जदारांची मुलाखत त्याच दिवशी दुपारी लगेच घेण्यात येईल.

अटी व शर्ती :–

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

2) सदर पदांची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल.

3) या पदावरील अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

4) इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज महापालिका आयुक्त, नागपूर महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेकडे नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दिलेल्या प्रपत्रात भरून थेट सादर करावेत. इतर प्रपत्रात सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

5) शासन निर्णय दि. 09 फेब्रुवारी 2018 मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने करार/कंत्राटी पध्दती निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकीच्या अटी शर्तीबाबत तसेच सदर नियुक्त कर्मचा–यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत नमूद असल्याने उक्त पदावरील नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरूपाची असून पुढे नियमित करण्यात येणार नाही.

6) वयोमर्यादा विचारात घेतांना दि. 22/07/2021 ही तारीख ग्राहय धरण्यात येईल.

7) उमेदवारांनी त्यांच्या वय, शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती सांक्षाकिंत करून जोडाव्यात.

8) उमेदवारांनी अर्ज सादर करून अर्जासोबत एक फोटो चिकटवावा व एक फोटो संलग्न करावा.

9) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विविक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र /हमीपत्र उमेद्‌वाराला दयावे लागेल.

10) करार पध्दतीवरील उमेदवारांना नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही,

11) उमेदवारांनी निवड प्रक्रिये दरम्यान नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.nmcnagpur.gov.in वरील सुचनांची नोंद घ्यावी. तसेच इतर कोणत्याही मार्गाने सूचना देण्यात येणार नाही. याची उमेदारांनी नोंद घ्यावी.

12) मुलाखतीअंती प्राप्त गुणानुसार गुणवत्ता यादी व प्रतिक्षा यादी म.न. पा. चे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येवुन त्यानुसार आदेश निर्गमीत करण्यात येईल.

उपरोक्त पदाकरिता अर्ज विहीत नमुन्यातच सादर करावयाचा असून अर्जाचा नमूना व उक्त पदांकरिता आवश्यक अर्हता /अटी / शर्ती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर उपलब्ध आहे.

हस्ता/–राधाकृष्णन बी.
आयुक्त
महानगरपालिका, नागपूर

दि. 09/07/2021

# <u>अर्जाचा नमूना</u>

फोटो

1. पदाचे नाव :– ..............................................................

2. अर्जदाराचे नांव :– ..............................................................

3. पूर्ण पत्ता :– ..............................................................
..............................................................
..............................................................

भ्रमणध्वनी क्रमांक :– ..............................................................
ई–मेल आय डी :– ..............................................................

4. जन्म दिनांक :– ..............................................................

5. दि. 22/07/2021 ला वय :– ..............................................................

6. शैक्षणिक पात्रता :– ..............................................................
..............................................................

| उत्तीर्ण परीक्षा | विद्यापीठ | श्रेणी | टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

7. अनुभव :– ..............................................................

| अ. क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | कर्तव्य व जबाबदारी | कालावधी | उल्लेखनीय कामगीरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

स्वाक्षरी